महावितरण

# जाहीर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री/तारतंत्री व कोपा या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते की, महावितरण, सिव्हिल लाईन्स विभागाअंतर्गत सन २०२४-२५ करिता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी प्रशिक्षणाकरिता करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी http://www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारी करिता दिनांक ०५.०२.२०२४ (००:०० तासांपासुन) ते दिनांक ११.०२.२०२४ (२४:०० तासापर्यंत) मंडल निहाय आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन (online) अर्ज करावे. सिव्हिल लाईन्स विभागाचा आस्थापना नोंदणी क्रमांक खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | मंडलाचे नाव | आस्थापना नोंदणी क्रमांक | कोपा | वीजतंत्री | तारतंत्री | माहिती तंत्रज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपूर शहर मंडल नागपूर | E03212700269 | १२ | ० | ० | १२ |

(१) शैक्षणिक अर्हता : (१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण. (२) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री/तारतंत्री व कोपा या व्यवसायात परीक्षा उत्तीर्ण. (२) शैक्षणिक दस्तऐवज (१) एस.एस.सी. व आय.टी.आय. वीजतंत्री/तारतंत्री चार सेमिस्टर व कोपा या व्यवसायातील दोन सेमिस्टरची उत्तीर्ण गुणपत्रिकेची मुळप्रत. (२) आधारकार्ड व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषंगीक आवश्यक कागदपत्रांची मुळप्रत उमेदवाराने स्वत:च्या प्रोफाईलवर स्कॅन करून अपलोड करावे. (३) विद्यावेतन : प्रचलित नियमाप्रमाणे लागू राहिल. (४) वयोमर्यादा : दिनांक ३१.०१.२०२४ पर्यंत १८ ते ३२ वर्ष आवश्यक तसेच मागासवर्गीयांसाठी वयोमर्यादा ०५ वर्ष शिथील राहील. वरील शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवाराची नोंदणी ग्राह्य धरली जाईल. (५) नमुद पद संख्या कमी-अधिक करण्याचे व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारांस कळविला जाणार नाही. (६) भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडून दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल. (७) वरील कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर न केल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही. (८) शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. व आय.टी.आय. गुणांच्या टक्केवारीनुसार (अनुक्रमे ४० व ६० टक्के) अटी व शर्तींच्या अधिन राहून प्रवर्गनिहाय निवड केली जाईल. (९) शासन निर्णयानुसार अनुसुचित जाती या प्रवर्गाकरिता १:१० व अनुसुचित जमाती या प्रवर्गाकरिता १:११ या प्रमाणानुसार पदे राखीव व महिलांकरिता शासन निर्णयानुसार पदे राखीव राहतील. (१०) तसेच उमेदवारांनी संकेतस्थळावर Online Registration ची नोंदणी केल्याची प्रत (www.apprenticeshipindia.org) व शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या गुणपत्रिका/प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रतीसह आपला अर्ज दि. ०५.०२.२०२४ ते ११.०२.२०२४ पर्यंत संबंधीत कार्यालयास सादर करावे व ज्या उमेदवारांनी वर्ष २०२४ मध्ये नविन पोर्टलवर (www.apprenticeshipindia.org) Online अर्ज केलेला आहे त्यांनी सुध्दा आपले सर्व दस्तऐवज संबंधित कार्यालयात अर्जासोबत सादर करावे. ते उमेदवारांची प्रशिक्षणाकरिता निवड करण्याबाबत विचार करण्यात येणार आहे.

कार्यकारी अभियंता,
संवसु मंडळ, मराविविकंम,
नागपूर शहर मंडळ

NZ / PRO No: 12/2024 Dt. 31.01.2024